Maharashtra State Veterinary Council
Statutory Body Constituted by Govt. of Maharashtra Under Indian Veterinary Council Act 1984, of Govt. of India
East High Court Road, Near Dayoo Bhawan, Civil Lines, Nagpur 440 001 Phone : 2550996, Fax : 2550865

जावक क्रमांक : निबंधक/मरापप/निवडणुक/ १००१-८० /२०१७, नागपूर, दिनांक १/११/२०१७

निवडणुक कार्यक्रम प्राधान्य

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, ........................ (सर्व)

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, .................. (सर्व)

**विषयः- महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद निवडणुक कार्यक्रम जिल्हा निहाय वैद्य पशुवैद्यकाची प्रारुप मतदार यादी बाबत...**

संदर्भः- १) शासनाचे पत्र क्रमांक- संकिर्ण- २०१७/प्र.क्र.१०३/पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ५ ऑक्टोंबर, २०१७

२) राज्य स्तरीय वृत्तपत्रातील जाहिरात व वेबसाईटवर प्रसिध्दी.

३) शासनाचे पत्र क्रमांक- संकिर्ण- २०१७/प्र.क्र.१०३/पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १३ ऑक्टोंबर, २०१७

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर च्या ४ सदस्यांची निवडणुक कार्यक्रम संदर्भिय पत्र क्रमांक-१ नुसार राजपत्रात शासनाद्वारे प्रसिध्द करण्यांत आली आहे. तसेच संदर्भिय पत्र क्रमांक- २ अन्वये महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर या कार्यालयाकडुन राज्य स्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देवुन व वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आली असुन संदर्भिय पत्र क्रमांक-३ अन्वये मा.सचिव (पदुम), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२ यांचेकडुन निवडणुक कार्यक्रमास मान्यता प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र राज्यातील वैद्य पशुवैद्यकाची यादी अधिनियम ३८ च्या नियम क्रमांक- ३ च्या (ख) (२) नुसार दिनांक २५/१०/२०१७ अखेर नोंदणी केलेल्या वैद्य पशुवैद्यकांची जिल्हा निहाय प्रारुप मतदार यादी आपणाकडे पुढील कार्यवाहीकरीता सोबत जोडुन पाठविण्यांत येत आहे. तरी सदर यादी आपल्या जिल्हयातील सर्व पशुवैद्यकांच्या निदर्शनास आणण्यात यावी. तसेच जिल्हयातील अधिनस्त संस्था व आपल्या मुख्यालयी नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयामध्ये प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी करण्यांत यावी जेणे करुन जिल्हातील कोणताही पशुवैद्यक निवडणुक प्रक्रिये पासुन वंचित राहणार नाही याची योग्य ती काळजी घ्यावी. तसेच जिल्हा/ तालुका स्तरावरील सभेत याबाबतची माहिती दयावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास अवगत करावा.

-- २ --

सदरची वैद्य पशुवैद्यकांची जिल्हा निहाय प्रारुप मतदार यादी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व), जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व) व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांचे ई-मेलवर पाठविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषदेच्या वेबसाईटवर जिल्हा निहाय प्रारुप मतदार यादी प्रकाशित करण्यांत आलेली आहे.

जिल्हा निहाय प्रसिध्द प्रारुप मतदार यादीच्या अनुषंगाने नियम-३ च्या पोटनियम (३) अन्वये ज्या पशुवैद्यकाचे दावे व हरकती असल्यास सबंधितांनी सोबत जोडलेल्या प्रपत्र- एक-अ (नियम ३ (४) आणि ५ पहा) मतदार यादीत नांवाचा अंर्तभाव व दुरुस्ती बाबतचे आक्षेप दाखल करण्यासाठी विहीत नमुन्यात माहिती दिनांक २७/११/२०१७ पर्यन्त या कार्यालयास पाठविण्यात यावीत. दिनांक २७/११/२०१७ नंतर सबंधीत पशुवैद्यकाचे दावे व हरकती सबंधी प्रपत्र प्राप्त झाल्यास त्याबाबत विचार केला जाणार नाही याची गंभीर नोंद घेण्यात यावी. तसेच याबाबत सबंधीतांना आपले स्तरावरुन अवगत करण्यांत यावे, ही विनंती.

**सहपत्र :- जिल्हा निहाय प्रारुप मतदार यादी (अ.क्र. १ ते ..........)**
**दावे व हरकती प्रपत्र- एक-अ.**

**निबंधक,**
**महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद,**
**नागपूर**

**प्रतिलिपी :-**

१) मा.सचिव (पदुम), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२ यांना माहिती करीता सविनय सादर.

२) मा.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७ यांना माहिती करीता सविनय सादर व विनंती करण्यांत येते की, कृपया जिल्हा निहाय प्रारुप मतदार यादी खात्याच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत यावी व आपले स्तरावरुन अधिनस्त अधिकाऱ्यांना वरील प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत सुचना देण्यांत याव्यात.

३) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ लातुर/ अमरावती/ नागपूर यांना विनंती करण्यांत येते की, सदरची यादी विभागातील अधिनस्त जिल्हे व आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रशिध्द करण्यांत यावी.

४) निबंधक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर कार्यालयात निरीक्षणासाठी उपलब्ध.